


## “श्रीं” चे गादी समोर दुपारी ११ वाजता होणारी आरती

(“श्रीं” ची पंचोपचार पूजा, आरती व महानैवेद्य)

## ॥ श्री गजानन महाराजांची आरती ॥

॥ श्री समर्थ सत् गुरु गजानन महाराज की जय ॥
जय जय सत् चित् स्वरूपा स्वामी गणराया ।
अवतरलासी भूवर जड-मुढ ताराया ॥ जयदेव जयदेव ॥ धृ०॥

निर्गुण ब्रह्म सनातन अव्यय अविनाशी । स्थिरचर व्यापून उरलें जें या जगतासी ॥
तें तूं तत्व खरोखर निःसंशय असशी । लीलामात्रें धरिलें मानवदेहासी ॥ जयदेव जयदेव ॥ १ ॥

जय जय सत् चित् स्वरूपा स्वामी गणराया ।
अवतरलासी भूवर जड-मुढ ताराया ॥ जयदेव जयदेव ॥ धृ०॥

होऊं न देशी त्याची जाणिव तूं कवणा । करूनी ‘गणि गण गणांत बोते’ या भजना ॥
धाता हरिहर गुरूवर तूंचि सुखसदना । जिकडें पहावें तिकडें तूं दिससी नयना ॥ जयदेव जयदेव ॥ २ ॥

जय जय सत् चित् स्वरूपा स्वामी गणराया ।
अवतरलासी भूवर जड-मुढ ताराया ॥ जयदेव जयदेव ॥ धृ०॥

लीला अनंत केल्या बंकट सदनास । पेटविले त्या अग्नीवांचूनि चिलमेस ।
क्षणांत आणिलें जीवन निर्जल वापीस । केला ब्रह्मगिरीच्या गर्वाचा नाश ॥ जयदेव जयदेव ॥ ३ ॥

जय जय सत् चित् स्वरूपा स्वामी गणराया ।
अवतरलासी भूवर जड-मुढ ताराया ॥ जयदेव जयदेव ॥ धृ०॥

व्याधी वारून केलें कैकां संपन्न । करविलें भक्तालागी विठ्ठल दर्शन ।
भवसिंधू हा तरण्या नौका तव चरण । स्वामी दासगणूंचे मान्य करा कवन ॥ जयदेव जयदेव ॥ ४ ॥

जय जय सत् चित् स्वरूपा स्वामी गणराया ।
अवतरलासी भूवर जड-मुढ ताराया ॥ जयदेव जयदेव ॥ धृ०॥



॥ श्री विठ्ठलाची आरती ॥

युगें अठ्ठावींस विटेवरी उभा । वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा ।
पुंडलिकाचे भेटीं परब्रह्म आलें गा । चरणी वाहे भीमा उद्धरी जगा ॥ १ ॥

जयदेव जयदेव जय पांडुरंगा, हो हरि पांडुरंगा ।
रखुमाई वल्लभा, राईच्या वल्लभा पावें जिवलगा ॥ जयदेव जयदेव ॥ धृ०॥

तुळसी माळा गळां कर ठेऊनि कटीं । कासें पितांबर कस्तुरी लल्लाटीं ।
देव सुरवर नित्य येती भेटी । गरुड हनुमंत पुढें उभे राहती ॥ २ ॥

जयदेव जयदेव जय पांडुरंगा, हो हरि पांडुरंगा ।
रखुमाई वल्लभा, राईच्या वल्लभा पावें जिवलगा ॥ जयदेव जयदेव ॥ धृ०॥

धन्य वेणूनाद अणुक्षेत्रपाळा । सुवर्णाचीं कमळें वनमाळा गळां ।
राई रखुमाबाई राणीया सकळां । ओवाळीती राजा विठोबा सांवळा ॥ ३ ॥

जयदेव जयदेव जय पांडुरंगा, हो हरि पांडुरंगा ।
रखुमाई वल्लभा, राईच्या वल्लभा पावें जिवलगा ॥ जयदेव जयदेव ॥ धृ०॥

ओवाळूं आरत्या कुर्वंड्या येती । चन्द्रभागेमाजीं सोडुनिया देती ।
दिंड्या पताका वैष्णव नाचती । पंढरीचा महिमा, द्वारकेचा महिमा वर्णावा किती ॥ ४ ॥

जयदेव जयदेव जय पांडुरंगा, हो हरि पांडुरंगा ।
रखुमाई वल्लभा, राईच्या वल्लभा पावें जिवलगा ॥ जयदेव जयदेव ॥ धृ०॥

आषाढी कार्तिकी भक्तजन येती, हो साधुजन येती । चंद्रभागेमाजीं स्नानें जें करिती ।
दर्शन हेळामात्रें तयां होय मुक्ति । केशवासी नामदेव, माधवासी नामदेव भावें ओवाळिती ॥ ५ ॥

जयदेव जयदेव जय पांडुरंगा, हो हरि पांडुरंगा ।
रखुमाई वल्लभा, राईच्या वल्लभा पावें जिवलगा ॥ जयदेव जयदेव ॥ धृ०॥

## ।। कापूर आरती ।।

कर्पूरगौरं करूणावतारं । संसारसारं भुजगेंद्रहारम् ।।
सदावसंतं हृदयारविन्दे । भवंभवानी सहितं नमामि ।।
मंदारमाला कुलीताल कायै । कपाल मालांकित शेखराय ।।
दिव्यांबरायै च दिगंबराय । नमः शिवाय नमः शिवाय ।।
।। ॐ कर्पूर निरांजन दीपं समर्पयामी ।।

## ।। मंत्र पुष्पांजलि ।।

ॐ यज्ञेन यज्ञमयजंत देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् ।
ते ह नाकं महिमानः सचंत यत्र पूर्वे साध्याः सन्ति देवः ।।
ॐ राजाधिराजाय प्रसह्य साहिने । नमो वयं वैश्रवणाय कुर्महे ।।
स मे कामान् कामकामाय मह्यं । कामेश्वरो वैश्रवणो ददातु ।
कुबेराय वैश्रवणाय महाराजाय नमः ।।
ॐ स्वस्ति । साम्राज्यं, भौज्यं, स्वाराज्यं, वैराज्यं,
पारमेष्ठ्यं राज्यं, महाराज्य माधिपत्यमयं, समंतपर्यायीस्यात्
सार्वभौमः सार्वायुष आंतादा परार्धात् पृथिव्यै समुद्रपर्यन्ताया एकराळिति: ।
तदप्येष श्लोको ऽ भिगीतो मरूतः परिवेष्टारो मरूतस्या ऽ वसन् गृहे ।।
आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवाः सभासद इति ।।
एकदन्ताय विद्महे वक्रतुण्डाय धीमहि । तन्नो दन्ति प्रचोदयात् ।।
ॐ गुरुदेवाय विद्महे, परम् ब्रह्माय धीमहि । तन्नो गुरुः प्रचोदयात् ।।
मंत्र पुष्पांजली समर्पयामि । नमस्कारोमि ।।

## ।। श्लोक ।। (भुजंगप्रयात वृत्त)

सदासर्वदा योग तुझा घडावा ।
तुझे कारणी देह माझा पडावा ।।
उपेक्षूं नको गुणवंता अनंता ।
रघुनायका मागणे हेची आता ।। १ ।।
उपासनेला दृढ चालवावे ।
भूदेव संतासि सदा नमावे ।।
सत्कर्मयोगे वय घालवावे ।
सर्वांमुखी मंगल बोलवावे ।। २ ।।

**॥ अष्टक ॥** (श्री दासगणू कृत)

गजानना गुणागरा, परम मंगला पावना ।
अशींच अवघे हरी, दुरीत तेवि दुर्वासना ॥
नसें त्रिभुवनामधे, तुजविन आम्हां आसरा ।
करी पदनतावरी, बहु दया न रोषा धरा ॥ १ ॥

निरालसपणें नसे, घडलि अल्प सेवा करी ।
तुझी पतितपावना, भटकलो वृथा भूवरी ॥
विसंबत न गाय ती, आपुलिया कधीं वांसरा ।
करी पदनातावरी, बहु दया न रोषा धरा ॥ २ ॥

अलास जगीं लावण्या, परतुनी सु-वाटे जन ।
समर्थ गुरूराज ज्या, भुषवि नाम नारायण ॥
म्हणून तुज प्रार्थना, सतत जोडुनिया करा ।
करी पदनतावरी, बहु दया न रोषा धरा ॥ ३ ॥

क्षणांत जल आणिले, नसून थेंब त्या वापिला ।
क्षणांत गमनाप्रती, करिसि इच्छिलेल्या स्थळा ॥
क्षणांत स्वरूपे किती, विविध धरिसी धीवरा ।
करी पदनतावरी, बहु दया न रोषा धरा ॥ ४ ॥

अगाध करणी तुझी, गुरूवरा ! न लोकां कळे ।
तुला त्यजुनी व्यर्थ ते, आचरितात नाना खुळे ॥
कृपा उदक मागती, त्यजुनी गौतमीच्या तिरा ।
करी पदनतावरी, बहु दया न रोषा धरा ॥ ५ ॥

समर्थ स्वरूपाप्रती, धरून साच बाळापूरी ।
तुम्ही प्रगट जाहलां, सुशिल बाळकृष्णा घरी ॥
हरिस्वरूप घेऊनि, दिधली भेट भीमातिरा ।
करी पदनतावरी, बहु दया न रोषा धरा ॥ ६ ॥

सच्छिद्र नौकेप्रती, त्वदिय पाय हे लागतां।
जलांत बुडतां तरी, तिजसी नर्मदा दे हाता ॥
अशा तुजसि वाणण्या, नच समर्थ माझी गिरा।
करी पदनतावरी, बहु दया न रोषा धरा ॥ ७ ॥

अतां न बहु बोलतां, तव पदांबुजा वंदितो।
पडो विसर ना कदा, मदिय हेंचि मी मागतों ॥
तुम्ही वरद आपुला, कर धरा गणूच्या शिरा।
करी पदनतावरी, बहु दया न रोषा धरा ॥ ८ ॥

## ॥ श्लोक ॥ (वृत्त -इंद्रवज्रा)

ज्या ज्या स्थळी, हे मन जाय माझे।
त्या त्या स्थळी, हे निजरूप तुझे ॥
मी ठेवितों, मस्तक ज्या ठिकाणी।
तेथे तुझें, सत् गुरू पाय दोन्ही।
॥ श्री समर्थ सत् गुरु गजानन महाराज की जय ॥


## ॥ प्रदक्षिणा ॥

यानि कानि च पापानि जन्मान्तरकृतानि च।
तानि तानि विनश्यन्ति प्रदक्षिणं पदे पदे ॥

## ॥ क्षमापनम् ॥

अन्यथा शरणं नास्ति, त्वमेव शरणं मम।
तस्मात्कारूण्यभावेन, रक्षस्व परमेश्वर।
मंत्रहीनं क्रियाहीनं, भक्तिहीनं सुरेश्वर।
यत्पुजितं मया देव, परिपूर्ण तदस्तु मे।
आवाहनं न जानामि, न जानामि तवार्चनम्।
पूजा चैव न जानामि, क्षमतां परमेश्वर ॥
॥ श्री समर्थ सत् गुरु गजानन महाराज की जय ॥
॥ जय जय रघुवीर समर्थ ॥
"अनंतकोटी... ब्रह्मांडनायक... महाराजाधिराज... योगीराज...
परम् ब्रह्म ... सत् चित् आनंद ... भक्तप्रतिपालक... शेगांवनिवासी...
समर्थ सत् गुरु ... श्री गजानन महाराज कि... जयऽऽऽ... !!!"

@@@@@



"श्रीं" चे गादी समोर होणारी सायंकाळची (सूर्यास्ताची) आरती

**॥ आरती स्वामीराया ॥**

( चाल - आरती भुवनसुंदराची )

॥ श्री समर्थ सत् गुरु गजानन महाराज की जय ॥
ओवाळीतो स्वामीराया । माथा पदी ठेवूनीया ॥ धृ० ॥

आवरी जगन्मोहिनीला । दावी चिन्मय स्वरूपाला ॥
देई सद्बुध्दी मजला । प्रेमे तव यश गाण्याला ॥
भक्तांकितां स्वामीराया, चरणी मी शरण । करूनी भय हरण, दावी सुख सदन ॥
अमित मम दोष त्यागुनीयां । विनवितो दास तुला सदया ॥ १ ॥


ओवाळीतो स्वामीराया । माथा पदी ठेवूनीया ॥ धृ० ॥

जन-पदमुक्ति-पदान्याया । स्थली या अवतरला राया ॥
ही जड मुढ मनुज-काया । पदीं तव अर्पियली राया ॥
हे दिग्वसन योगीराया, नको मज जनन । पुनरपि मरण, येत तुज शरण ॥
पुरवी ही आस संतराया । प्रार्थना हीच असे पाया ॥ २ ॥

ओवाळीतो स्वामीराया । माथा पदी ठेवूनीया ॥ धृ० ॥

नेण्या अज्ञ-तमा विलया । अलासी ज्ञान रवी उदया ॥
करी तु ज्ञानी जनाराया । निरसुनी मोह-पटल माया ॥
गजानन संतराया, असशी बळवंत । तसा धीमंत, नको बघु अंत ॥
विनवितो दास तुम्हा राया । नका त्या दुर करू सदया ॥ ३ ॥

ओवाळीतो स्वामीराया । माथा पदी ठेवूनीया ॥ धृ० ॥



## ।। कापूर आरती ।।

जयजय कर्पूरगौरा । तारी, जयजय कर्पूरगौरा ।। धृ।।

भस्म हे चर्चित, निल गलांबर, झल्लालती रूंडमाळा ।।
इंदु लल्लाटी, शोभतसे कटी । गजचर्म व्याघ्रांबरा ।
शंभो, जयजय कर्पूरगौरा ।।१।।

श्वेतासनी, महाराज विराजित । अंकी बसे सुंदरा ।।
भक्त दयाघन, वंदिती चरण । धन्य तु लीलावतारा ।।
शंभो, जयजय कर्पूरगौरा ।।२।।

मतिमंद दीन, झालो पदी लीन । पार करी संसारा ।।
काशीसूतात्मज, मागतसे तुज । द्या चरणी मज थारा ।।
शंभो, जयजय कर्पूरगौरा ।।३।।

जयजय कर्पूरगौरा । तारी, जयजय कर्पूरगौरा ।। धृ।।

कर्पूरगौरं करूणावतारं । संसारसारं भुजगेंद्रहारम् ।।
सदावसंतं हृदयारविन्दे । भवंभवानी सहितं नमामि ।।
मंदारमाला कुलीताल कायै । कपाल मालांकित शेखराय ।।
दिव्यांबरायै च दिगंबराय । नमः शिवाय नमः शिवाय ।।

।। ॐ कर्पूर निरांजन दीपं समर्पयामी ।।

## ।। मंत्र पुष्पांजलि ।।

ॐ यज्ञेन यज्ञमयजंत देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् ।
ते ह नाकं महिमानः सचंत यत्र पूर्वे साध्याः सन्ति देवः ।।
ॐ राजाधिराजाय प्रसह्य साहिने । नमो वयं वैश्रवणाय कुर्महे ।।
स मे कामान् कामकामाय मह्यं । कामेश्वरो वैश्रवणो ददातु ।
कुबेराय वैश्रवणाय महाराजाय नमः ।।
ॐ स्वस्ति । साम्राज्यं, भौज्यं, स्वाराज्यं, वैराज्यं,
पारमेष्ठ्यं राज्यं, महाराज्य माधिपत्यमयं, समंतपर्यायीस्यात्
सार्वभौमः सार्वायुष आंतादा परार्धात् पृथिव्यै समुद्रपर्यन्ताया एकराळिति: ।
तदप्येष श्लोको ऽ भिगीतो मरूतः परिवेष्टारो मरूतस्या ऽ वसन् गृहे ।।
आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवाः सभासद इति ।।
एकदन्ताय विद्महे वक्रतुण्डाय धीमहि । तन्नो दन्ति प्रचोदयात् ।।
ॐ गुरुदेवाय विद्महे, परम् ब्रह्माय धीमहि । तन्नो गुरुः प्रचोदयात् ।।
मंत्र पुष्पांजली समर्पयामि । नमस्कारोमि ।।
।। श्री समर्थ सत् गुरू गजानन महाराज की जय ।।

## ।। श्लोक ।। (वृत्त-भुजंगप्रयात)

सदासर्वदा योग तुझा घडावा ।
तुझे कारणी देह माझा पडावा ।।
उपेक्षूं नको गुणवंता अनंता ।
रघुनायका मागणे हेची आता ।।१।।

उपासनेला दृढ चालवावे ।
भूदेव-संतासि सदा नमावे ।।
सत्कर्मयोगे वय घालवावे ।
सर्वांमुखी मंगल बोलवावे ।।२।।

।। श्री समर्थ सत् गुरू गजानन महाराज की जय ।।

## ॥ नमस्काराष्टक ॥ (वसंततिलका वृत्त)

योगी दिगंबर विरक्त, विदेही संत ।
उद्यान भक्तितरूचे, फुलवी वसंत ॥
शेगांव क्षेत्र बनले, गुरूच्या प्रभावे ।
वंदू गजानन पदां, बुज भक्तिभावे ॥ १ ॥

ओहोळ घाण जल, वाहत विषयांचे ।
भावार्थ तोय स्फटिका, सम तेथ साचे ॥
तुंबी तुडुंब भरले, किती स्तोत्र गावें ।
वंदू गजानन पदां, बुज भक्तिभावे ॥ २ ॥

संत्रस्त पंक्तिस करी, बहु काकपंक्ती ।
गेली क्षणात उठुनी, परसोत उक्ती ॥
आत्मैक्य हे गुरूवरा, प्रचितीस यावे ।
वंदू गजानन पदां, बुज भक्तिभावे ॥ ३ ॥

पेटूनी मंचक धडा, डत अग्निज्वाला ।
मध्ये सुशांत गुरूमूर्ति, न स्पर्श झाला ॥
ते योग वैभव पुन्हा, नयना दिसावे ।
वंदू गजानन पदां, बुज भक्तिभावे ॥ ४ ॥

तारीयली सहजची, तरि नर्मदेत ।
देवी सदिव्य प्रकटे, नवलाव होत ॥
ज्याच्या कृपे भवजली, तरूनीच जावे ।
वंदू गजानन पदां, बुज भक्तिभावे ॥ ५ ॥

जे ब्रह्म ब्रह्मगिरीला, कळले न साच ।
पांडित्य मात्र नुसते, उरला तसाच ॥
त्या सांगती नित मुखे, हरीनाम घ्यावे ।
वंदू गजानन पदां, बुज भक्तिभावे ॥ ६ ॥

बाधे तृषा गुरूवरा, जल ना मिळाले ।
खाचाड रूक्ष असतां, झणि तोय आले ॥
प्रार्थू पदीं हृदय, भक्ति जले वहावे ।
वंदू गजानन पदां, बुज भक्तिभावे ॥ ७ ॥

स्वामी समर्थ जगती, अवतार घेती ।
कष्टोनि धेनु व्दिज, धर्मचि रक्षिताती ॥
घ्या धेनुदास पदरी, जरी पापि ठावें ।
वंदू गजानन पदां, बुज भक्तिभावे ॥ ८ ॥

**॥ श्लोक ॥ (वृत्त -इंद्रवज्रा)**

ज्या ज्या स्थळी हे, मन जाय माझे ।
त्या त्या स्थळी हे, निजरूप तुझे ॥
मी ठेवितों मस्तक, ज्या ठिकाणी ।
तेथे तुझें सत् गुरू पाय दोन्ही ॥

**॥ प्रदक्षिणा ॥**

यानि कानि च पापानि जन्मान्तरकृतानि च ।
तानि तानि विनश्यन्ति प्रदक्षिणं पदे पदे ॥

॥ क्षमापनम् ॥

अन्यथा शरणं नास्ति, त्वमेव शरणं मम ।
तस्मात्कारूण्यभावेन, रक्षस्व परमेश्वर ।
मंत्रहीनं क्रियाहीनं, भक्तिहीनं सुरेश्वर ।
यत्पुजितं मया देव, परिपूर्ण तदस्तु मे ।
आवाहनं न जानामि, न जानामि तवार्चनम् ।
पूजा चैव न जानामि, क्षमतां परमेश्वर ॥
॥ श्री समर्थ सत् गुरु गजानन महाराज की जय ॥
॥ जय जय रघुवीर समर्थ ॥
"अनंतकोटी... ब्रह्मांडनायक...महाराजाधिराज...योगीराज... परम् ब्रह्म ...
सत् चित् आनंद ... भक्तप्रतिपालक... शेगांवनिवासी...
समर्थ सत् गुरु ...श्री गजानन महाराज कि... जयऽऽऽ... !!!"

@@@@@



**॥ शेजारती ॥**

( रात्री ९.३० वाजता )

आतां स्वामी सुखें निद्रा, करा अवधुता । निद्रा करा अवधुता ॥
चिन्मय, सुखधामी जाऊनी, पहुडा एकांता ॥धृ॥

वैराग्याचा कुंचा घेऊनी, चौक झाडीला । गुरु हा चौक झाडीला ॥
तयावरी, सप्रेमाचा, शिडकावा केला ॥ १ ॥

पायघड्या घातल्या सुंदर, नवविधा भक्ती । सुंदर नवविधा भक्ती ॥
ज्ञानाच्या समया, उजळुनी, लाविल्या ज्योति ॥ २ ॥

भावार्थाचा मंचक हृदयाकाशीं, टांगिला । हृदयाकाशीं टांगिला ॥
मनाची, सुमनें करूनी, केलें शेजेला ॥ ३ ॥

द्वैताचे, कपाट लोटुनी, एकत्र केले ॥
द्वैताचे, कपाट लोटुनी, एकत्र केले । गुरु हे एकत्र केले ॥
दुर्बुध्दीच्या, गांठी सोडुनी, पडदे सोडीयले ॥ ४ ॥

आशा तृष्णा, कल्पनेचा सांडुनी, गलबला । गुरु हा सांडुनी गलबला ॥
दया क्षमा, शांती दासी, उभ्या शेजेला ॥ ५ ॥

अलक्ष उन्मनी घेउनी, नाजुकसा शेला । गुरु हा नाजुकसा शेला ॥
निरंजनी सत् गुरु माझा, निजे शेजेला ॥ ६ ॥

निरंजनी सत् गुरु माझा, निजे शेजेला ॥

@@@@@